वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २१ मे २००५

अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक : संकीण-१००४/प्र.क्र.५७/सेवा-५.-- भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल, मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :-

१. *(i)* या नियमांना मुंबई नागरी सेवा ((सुधारणा) नियम, २००५ असे म्हणावे.

(ii) हे नियम दिनांक १ डिसेंबर २००४ पासून अंमलात आल्याचे समजण्यात यावे.

२. मुंबई नागरी सेवा नियम १९५९ मधील नियम ५३२ खालील सध्याच्या टीपेऐवजी पुढील टीप समाविष्ट करण्यात यावी **:-**

"टिप.- शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या अथवा जिच्या सेवा अन्यथा समाप्त करण्यात आल्या आहेत अशा व्यक्तीला, शासन सेवेत कर्तव्य बजावत असताना ज्ञात झालेल्या बाबींसंदर्भात साक्ष देण्यासाठी न्यायालयात वा विभागीय चौकशीच्या कामी उपस्थित राहावे लागणार असल्यास, काटकसरी विषयी अंमलात असणाऱ्या तरतुदींच्या अधीन राहून, सेवानिवृत्त होण्यापूर्वी सदर व्यक्ती जितके वेतन घेत होती तितके वेतन घेणाऱ्या त्या व्यक्तीच्या संवर्गातील शासकीय कर्मचाऱ्यांस दौऱ्यासाठी मिळणाऱ्या दराने प्रवासभत्ता आणि दैनिकभत्ता मिळेल. "

महाराष्ट्राच राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मीना अ जोशी,
शासनाच्या उप सचिव.

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai- 400 032, dated the 21st May 2005.

NOTIFICATION

CONSTITUTION OF INDIA.

NO.MISC -1004/CR-57/SER-5--In exercise of the powers conferred by the proviso to the article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Bombay Civil Services Rules, 1959, namely :-

1. (i) These Rules may be called the Bombay Civil Services (Amendment) Rules, 2005.

(ii) These Rules shall be deemed to have come into force with effect from the 1st December, 2004.

2. In rule 532 of the Bombay Civil Services Rules, 1959, for the existing Note, the following Note shall be substituted, namely :-

"*Note*.- Subject to the provisions of economy orders in force, a person who has retired from Government service or whose services have been otherwise terminated and who is required to attend a Court, of Law or a departmental enquiry for giving evidence in respect of facts which have come to his knowledge in the discharge of his public duties, may be allowed to draw travelling allowance and daily allowance at the same rate as may be drawn, while on tour, by a Government servant of his cadre and drawing pay equal to the pay last drawn by him in the Government Service".

By order and in the name of the Governor of Maharashtr

M. A. JOSHI,
Deputy Secretary to Government.

प्रतिः-

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट, नागपूर
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र , मुंबई
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा अधिकरी, मुंबई
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
राज्यपालांचे सचिव.
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्र्यांचे स्वीय सहायक.
मंत्रालयीन सर्व विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयाच्या विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
* प्रबंधक उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई.
उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
वित्त विभागातील सर्व कार्यासने.
निवड फाईल, वित्त विभाग, सेवा-५.
*पत्राद्वारे.